25 वर्षे
विकासाची

"माझे शहर, माझा अभिमान"

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,

भाईंदर (प.), ता.ठाणे 401101 दुरध्वनी क्रं.28192828

**पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग**

जा.क्र.मनपा/पा.पु.व मलनि/जन/२९५ /२०२६-२७ दि.१४/ ०५/२०२६

प्रति,
जनसंपर्क अधिकारी
जनसंपर्क विभाग
**मिरा भाईंदर महानगरपालिका.**

**विषय** :- प्रेस नोट प्रसिद्ध करणेबाबत ..

महोदय,

सोबत जोडलेली प्रेस नोट महानगरपालिकेच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात यावी.

(दिपक खांबित)
शहर अभियंता
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा व मलनिसारण विभाग

## // प्रेस नोट //

"क्रॉस कनेक्शनच्या नावाखाली नविन जलजोडणीचा बाजार, पाण्याच्या कमतरतेने नागरीक त्रस्त, तरी दोन्ही आमदार मात्र शांत" या मथळयाखाली श्री. आबाजी सावंत, MNB न्युज यांनी यु टयुब या माध्यमाव्दारे दि.12/05/2026 रोजी बातमी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने खुलासा सादर करण्यात येतो की, मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भोगवटा दाखला प्राप्त असणाऱ्या इमारतींना नविन नळजोडणी मंजूरी देण्यात येत आहे. मे. लोढा डेव्हलपर्स यांनी नविन नळजोडणी मंजूरी करीता अर्ज सादर केलेला आहे. सादर केलेल्या कागदपत्रांची मालमत्ता कर विभाग, नगररचना विभागामार्फत पडताळणी करुन त्यांचा अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर नविन नळजोडणी मंजूरी आदेश देण्यात आलेला आहे. तद्नंतर नळजोडणी शुल्काचा भरणा झाल्यानंतर जा.क्र.मनपा/पा.पु/25/2026-27 दि.12/05/2026 अन्वये जलजोडणी आदेश दिलेला आहे. सदर इमारतीस अंतर्गत जलवाहिनी मंजूर झालेली असुन ती अंथरण्यात देखिल आलेली आहे. महानगरपालिकेच्या वितरण जलवाहिनीस सदर अंतर्गत जलवाहिनी क्रॉस कनेक्शन केल्यानंतरच इमारतीच्या मंजूर जलजोडण्या जोडण्याची कार्यवाही करण्यात येते. त्याकरीता सदर विकासकास क्रॉस कनेक्शन करणेकरीता मंजूरी घेऊन आदेश पारित केलेला आहे व त्या अनुषंगाने मिरारोड (पुर्व), हाटकेश परिसरात क्रॉस कनेक्शन करण्याचे काम सुरु आहे. सदर इमारतीस भोगवटा दाखला प्राप्त असल्याने महानगरपालिकेच्या धोरणानुसारच नळजोडण्या मंजूर करण्यात आलेल्या आहेत. यामध्ये कोणत्याही प्रकारे विनापरवानगी तसेच अनिधिकृत जलजोडणी करण्यात आलेली नाही.

त्यामुळे, "क्रॉस कनेक्शनच्या नावाखाली नविन जलजोडणीचा बाजार, पाण्याच्या कमतरतेने नागरीक त्रस्त" अशी सदरची बाब नाही.

(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका